पुष्प २ रे : कैदी महात्मा – जप्त

जय हिंदमाता

# शाहिरी पुष्प-माळा.

## पुष्प ३ रें.

## पोवाडे.

---

### शाहिर कें. जामखेडकर.

### नमन

आदि नमन गौरि नंदना । सरस्वती । चरणा सरस्वती चरणा ।
देवी सह येऊनि द्यावी मती मज कवना ॥ जी जी जी
मग नमिन हिंद जननीला । राष्ट्र मातेला । भरत भूमिला ।
झटा तिच्या कार्यी विनती ही सकला ॥ जी जी
ज्ञानोबाराय तुकारामाला । रामदासाना । रामदासाना ।
ज्यानि चेतविला राष्ट्रीय विर बाणा ॥ जी जी
उमाबाई जिजामातेला । लक्ष्मीबाइना । वीर माताना ।
सावित्रिबाईला शाहिर करि नमना ॥ जी जी जी

23



पृथुराज प्रतापसिंहाना। आणि शिवचरणा। आणि शिवचरणा।
ज्यानि स्थापिल राज्य बुडविल यवना ॥ जी जी
तानाजि नेताजी आदि वीरांना। मुरार बाजीना। प्रल्हादपंताना।
ज्यानि यवनासि दाविला मराठी बाणा ॥ जी जी जी
संभाजी राणा संताजी। धनाजी रावाना। राजारामाना।
ज्यानि कठिण काळीं रक्षिल आर्य धर्माला ॥ जी जी जी
बाजिराव माधवरावाना। भाउ पेशव्याना। विश्वासरावाना।
राघोभरारीला बोलाविन त्याना यावया कवना ॥ जी जी
शिंदे होळकर गायकवाडाना। विंचूरकरांना। नारोशंकराना।
ज्यानि फोडल दिल्लीच्या यवनीतक्ताला ॥ जी जी जी
नाना पेशवे तात्या टोपीना। बापुगोखल्याना। लालुबक्षीना।
ज्यानि दिला प्राण प्रसंगे आर्यभू चरणा ॥ जी जी जी
अगरकर विष्णु शास्त्रि बाळ टिळकांना। लोकमान्याना लोक०।
ज्यानि दाविला मार्ग नीट हिंद पुत्रांना ॥ जी जी
दयानंद विवेकनंदाना। लेखरामजीना। श्रद्धानंदाना
ज्यानि दिला प्राणप्रसंगि धर्मरक्षणा ॥ जी जी जी
चाफेकर सावरकरांना। कान्हेरे कर्व्याना। नासिककरवीराना।
ज्यानि कारागारि सोशिल कष्ट सोडल भोगाना ॥ जी जी

आतां नमिन लालाजी दास बाबूना। नेहरू द्वयांना।
पितापुत्रांना। मालविय मुंजे खाडिलकर देशभक्ताना॥ जी
नंतर नमिन शांतिब्रिद। महात्मागांधीना। असहयोग्याना।
ज्यानि दाविला मार्ग शांततेचा जनतेला॥ जी जी
आणि नमिन शिवरामपंत ना। केळकराना। तात्या राव ना।
टिळक भक्ताना द्याहो आर्शिवाद या कवना॥ जी जी
सरत नमन साऱ्या देशभक्ताना। राष्ट्रवीराना। श्रोतृवृंदाना
कृपादृष्टी ठेवा गातो मी कवना॥ जी जी

---

## रणमर्द शाहिरास (गज्जल)

[शाहिर सोपानदेव.]

अर्जुनि कैशी झोंप घेशी! हिंदवीरा अशा घडीला।
उवडी आधी ही समाधी हिंदमाता वदे कुणाला? ॥धृ॥
तुण तुण्याची तार चढवी
गा पवाडे डफा ऽऽऽ वरी
जन चेतवुनी वीर-रसा देइ प्रेरणा
शाहिरा हे आव्हान तुजला॥१॥

याच गानाच्या निनादं
दशदिशा दुमवून दे
नक्तेज अंगि बाणवुनि आण खेंचुनी
शाहिरा त्या तुझ्या यशाला ॥ २ ॥
ज्या यशाने माय भूला
भूषविली अवनी तला
रक्षगास तिच्या पाळिले या सनातना
धन्य त्यांच्या पराक्रमाला ॥३॥
तुणतुणे तलवार हातीं
हत बलाशीं उठविलें
रणमर्द गडी सिंहगडी प्राण अर्पुनी
सिंह तान्हा लढोनी गेला ॥४॥

## बंदिशालेंत

### पॉवाडा

[ शाहिरः- सोपानदेव. ]

[ चालः- **शिवरायाचा सिंह तानाजी** ]

राष्ट्र देवते प्रणाम करितों मनापासुनी तुला
देइ गे आशिर्वचना मला ॥

कशास वाहूं बोल फुकाचे भारत माते तुला
बोल्ही खोल पहा चालला ॥
कितीक लोटांगणे घालणे तुझिया चरणावर
नको भक्तीचें अवडंबर ॥
चहूंकडे पसरले जाळें परदास्याचे अवकाळीं ॥
त्यांतही पहा हे आलें दुर्विलास अमुच्या भालीं ॥
चालले नाटकी चाळे हे तुझिया नांवाखालीं ॥
परंतु सारे तुडवुनि पायीं मिळविन मी मातिला
देइ गे आशिर्वचना मला ऽ जी जी ॥१॥
छत्रपतींचे छत्रपतीही झाले अनिवार
वाहुनी शिरकमलें तुजवर ॥
तव चरणाचे दास जाहले अढळ पदीं सत्वर
धन्य ते पुण्यश्लोक नरवर ॥
यशोगान गाऊनि तयांचे तुष्ट होऊं कां मनीं
कोरडे धन्यवाद देउनी ॥
कां यशोगान गावोनी शूराची मान्यता भेटे ॥
जणुं बांगड्याच फोनोच्या वाजतांत ऐसे वाटे ॥
छे नको नको ते चाळे मनिं मंगल आशा दाटे ॥

मनांत चाले एक घोषणा मुक्त करिन मी तुला
देइ गे आशिर्वचना मला ॥ जी जी ॥२॥
नकोत ती सुंदर व्याख्याने तुज पुढती द्यावया
सतत मी तयार राबावया ॥
किताब पदव्या लाथ सरसे देइ झुगारुनि दुर
तुझा मी पायींचा किंकर ॥
पक्वान्नाचे मधुर घास—छे नको नको कल्पना
दीन जनतेच्या त्या यातना ॥
स्वातंत्र्य प्राप्तिच्यासाठीं जाउनिया कारागारीं ॥
ये किती करुण किंकाळ्या बंधुंच्या हृदया विदारी ॥
तें अन्न बंदिशाळेचे गमतसे ह्मणूनि विषारी ॥
त्या अन्नाचा त्याग करुनि मी पडलों गे धरणिला
प्राण हा कंठीं बघ पातला ॥३॥

